RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ५७ (१६)] बुधवार, मे ४, २०२२/वैशाख १४, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १५४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त), नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ मे २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीडब्ल्यूआर-०३२०/प्र.क्र.६८ (भाग-१)/(३)/राउशु-३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालील नियम तात्काळ अंमलात आणणे आवश्यक वाटते, म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ मुंबईचा पंचवीस) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिध्दी शिवाय हे नियम तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ मुंबईचा पंचवीस) कलम १४३ च्या पोट-कलम (२) मधील खंड (च) आणि (ज १) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ यात सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे,—

१. या नियमांना, विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती (तिसरी सुधारणा) नियम, २०२२ असे संबोधण्यात यावे.

२. विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ मधील नियम ५ अ मध्ये,—

(अ) उप-नियम (४) खंड (अ) मधील, "जे सोळा चौरस मीटर क्षेत्रापेक्षा कमी आहेत आणि" हे शब्द वगळण्यात यावेत.

(ब) उप-नियम ४ (ब) वगळण्यात यावेत.

(क) उप-नियम (८) मध्ये, “वाईन विक्री” या शब्दानंतर “मोजमापानुसार वापरासाठी किंवा सीलबंद बाटल्यांमध्ये किंवा मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये परिभाषित केलेले ग्राउलर्स” हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 4th May 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No.BWR-0320/C.R.68 (Part-1)/(3)/EXC-3.— Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Special Permit and Licences Rules, 1952, should be brought into force with immediate effect and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, 1949 (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses *(f)* and *(h1)* of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Special Permit and Licences Rules, 1952, as follows, namely :—

1. These rules may be called the Special Permit and Licences (Third Amendment) Rules, 2022.

2. In rule 5A of the Special Permits and Licences Rules, 1952,—

(*a*) in sub-rule (4), in clause (a), the words at the beginning of the said clause "which is less than sixteen square metres in area and" shall be deleted;

(*b*) sub-rule (4B) shall be deleted;

(*c*) in sub-rule (8), after the words "sell wine" the words "by measure for consumption or in sealed bottles or in Growlers as defined under the Bombay Foreign Liquor Rules, 1953" shall be inserted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.